परसातील कुक्कुटपालन

एका आदिवासी स्टार्ट अपची यशोगाथा

Kanna K Siripurapu, Aneetha Kanukolanu, Sabyasachi Das and Chandrasekhar Nemani

स्थानिक जातीच्या कोंबड्याचे परसबागेतील कुक्कुटपालन हे व्यवस्थापनासाठी कमी जोखमीचे असून गरीब कुटुंबासाठी चांगले उत्पन्न मिळवून देणारे आहे. त्यामध्ये गरिबी दूर करणे, कुपोषण संपविण्याच्या क्षमतेबरोबर रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची सुद्धा क्षमता आहे. बाहेरील अल्प आधाराने सुरू केलेल्या लहान शेती उद्योगामुळे आंध्र प्रदेशातील आदिवासी समुदायाने आरोग्य व उपजीविका सुधारू शकते हे दाखवून दिले आहे.

परसातील कुक्कुटपालन हे व्यवस्थापनास सोपे असून चांगले उत्पन्न देते.

परंपरेने चालत आलेल्या घरगुती कुक्कुटपालनात (Backyard Poultry) स्थानिक प्रजाती तिथल्या हवामानाशी जुळवून घेत असल्यामुळे देशातील अंडी व कोंबडीच्या मासांची जेवढी मागणी आहे त्याच्या सुमारे ७०% पुरवठा घरगुती कोंबडी पालनातून होत आहे. पण गेल्या तीन दशकात हायब्रीड जातीच्या कोंबड्याची व्यापारी पद्धतीने कोंबडी पालन मोठ्या प्रमाणात व खूप झपाट्याने होताना दिसत आहे. खरं तर हा आधुनिक पोल्ट्री पद्धतीचा व्यवसाय संपूर्ण जगातच मोठ्या प्रमाणात फोफावताना दिसतो. अर्थात यामध्ये मोठ्या प्रमाणावर क्रॉसब्रीड होत असते. त्यामुळे कोंबडीचे मांस व अंड्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात देशामध्ये वाढत आहे. या प्रक्रियेचे आरोग्य व पर्यावरणावर गंभीर, विपरीत परिणाम क्रमप्राप्त आहे.

परसातील कुक्कुटपालन कार्यक्रम

भारतात अजूनही व्यापक प्रमाणात लहान स्वरूपात व अनेकदा मोकळ्या वावरणाऱ्या पसातील कुक्कुटपालन व्यवस्थापन आढळते. परसातील कुक्कुटपालनामध्ये फार मोठी क्षमता आहे. ही पद्धत लहान व सीमांत शेतकऱ्यांचे उत्पन्न व पोषण वाढविण्यासाठी परिपूर्ण आहे. हेच मॉडेल एकतर व्यापारी तत्त्वावर वाढवावे किंवा लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना सामावून घेऊन एकात्मिक पद्धतीने वाढवावे. विशेषतः कोरडवाहू शेती क्षेत्रामध्ये याचा उपयोग होईल.



परसातील कुक्कुटपालन हे व्यवस्थापनास सोपे असून चांगले उत्पन्न देते.

या संदर्भात २०१६ मध्ये आंध्र प्रदेश सरकारच्या पशु संवर्धन विभाग व आदिवासी विकास विभागाद्वारे १३००० आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न व पोषण सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवून 'ग्रामीण, देशी घरगुती कुक्कुटपालन' ही योजना तयार केली.

यात उत्पादन पद्धती, लसीकरण व आरोग्य सुविधा, प्रजनन केंद्रे व सीआयजी (Common Interest Group - CIG) पोल्ट्री भांडवल उभारणी ह्यावरून क्लस्टर निहाय लक्ष केंद्रित करण्यावर भर होता.

वासन (Wassan) ह्या अग्रणी तांत्रिक संस्थेद्वारे (LTA - Lead Technical Agency) हा कार्यक्रम श्रीकाकुलम, वायझीअनागराम, विशाखापटनम, पूर्व व पश्चिम गोदावरी ह्या ५ जिल्ह्यात १२९ समुहात सुरू करण्यात आला होता.

सदर लेख हा पेडाकोडापल्ली या विशाखपटनम जिल्ह्यातील गावांमध्ये राबवलेल्या ह्या प्रकल्पाचा अनुभव प्रदर्शित करीत आहे.

पुढाकार (The Initiative) - एक सुरवात

पेडाकोडापल्ली हे १०२ घरांचे पेडबायालु मंडळातील एक गाव आहे. त्यापैकी बहुतांश लोक गरीब असून ते उपजीविकेसाठी शेती व रोजगारी ह्यावर अवलंबून आहेत. पूर्वी त्यातील काही कुटुंबे हे त्यांच्या परसात कुक्कुटपालन करीत होते. स्थानिक कोंबड्यांच्या प्रजातींचा पुरवठा नसणे, रात्रीचा योग्य निवारा नसल्यामुळे, कोंबड्यांची सुरक्षा नसल्यामुळे, अज्ञान व आरोग्याच्या सोयीच्या अभावामुळे पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेली मरतुकी... इ. विविध कारणांमुळे त्यांनी परसातील कुक्कुटपालन बंद केले. त्यानंतर हा समुदाय त्यांचा खाण्यासाठी ब्रायलर चिकनचे मांस व अंडी ह्यासाठी व्यावसायिक उत्पादनावर अवलंबून राहिला

२०१६ च्या दुसऱ्या सहामाहीत वासन संस्थेने लाया (Laya) ह्या स्थानिक एनजीओच्या सहकार्याने ह्या गावात काम करणे सुरू केले. BYP (Backyard Poultry Progra) परसातील कुक्कुटपालन ह्याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी महिला व स्वयंसहायता गटांसोबत बैठका घेण्यात आल्या. परिणामी कॉमन इंटरेस्ट ग्रुपस् (CIG) तयार करण्यात आले. याकरिता सर्व सभासदांसाठी ३०० रुपये अनिवार्य करण्यात आले. ज्यामध्ये १०० रुपये सभासद नोंदणी फी व उरलेले २०० रुपये हे पक्षांच्या आरोग्य सेवेसाठी आगाऊ जमा करण्यात आले. प्रत्येक CIG ला ३००० रुपयांचे सहाय्य (२७०० रुपये कोंबड्यांसाठी रात्रीचा निवारा बांधण्यासाठी व ३०० रुपये ४५ दिवसांची ५ पिल्ले विकत घेण्यासाठी) परसातील कुक्कुटपालन सुरू करण्यासाठी देण्यात आले.

परसातील कुक्कुट प्रजनन केंद्र

स्थानिक CIG सदस्यांना स्थानिक पातळीवर देशी कोंबड्यांचा पुरवठा करण्यासाठी एक प्रजनन केंद्र स्थापन करण्यात आले. श्री. कोडा अल्बाईडोरा, पेडाकोडापल्ली गावातील CIG च्या एका सदस्यांनी बॅक यार्ड पोल्ट्री ब्रीडर फार्म स्थापण्याची व CIG सदस्यांना कोंबड्यांची पिल्ले पुरविण्याची मदत देऊ केली.

CIG बैठकीदरम्यान पेडाकोडापल्ली गावातील महिलांना परसातील कुक्कुटपालनाच्या कार्यप्रणालीची शिक्षित करताना





एक आदिवासी महिला आपल्या परसात कोंबड्यांचे व्यवस्थापन करताना

कोडा यांनी त्यांच्या शेतापैकी १/२ एकर जमीन ह्यासाठी देऊ केली. त्यांनी प्रजनन केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतः ३०,००० रुपये दिले तर प्रकल्पातून ९५,५०० रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. ही रक्कम शेड व पेनचे बांधकाम, कूपन, पाणी व खाद्य डिसपेंसर, पक्षी व एका वर्षाचे खाद्य विकत घेण्यासाठी वापरण्यात आली. ही प्रक्रिया २०१६ च्या दुसऱ्या सहामाहीत सुरू करण्यात आली. ती पूर्ण होण्यासाठी जवळपास ६ महिन्यांचा कालावधी लागला. बीवायपी (BYP - बॅक यार्ड पोल्ट्री) प्रजनन केंद्र हे मे २०१७ मध्ये ६० पक्ष्यांचे वितरण करून सुरू झाले.

बीवायपी प्रजनन केंद्र हे मूळ देशी कोंबड्यांच्या वाणाचे उत्पादन व स्थानिक पुरवठा ह्यामुळे परिवर्तनास सहाय्यक ठरले. कोडा ह्यांनी आजपर्यंत ४८० एक महिन्यांचे पिल्ले ८६ सीआयजी सदस्यांना ८० रुपये प्रती पिल्लू याप्रमाणे विकले. प्रत्येक कुटुंबाने ५-१० कोंबड्या त्यांच्या परसात वाढविल्या.

प्रशिक्षित अर्ध व्यावसायिकांनी (Pra-Venterinarians) आरोग्य सेवा पुरविल्यामुळे कोंबड्यांचे मरतुकीचे प्रमाण शून्यावर आले.

सीआयजी सदस्यांव्यतिरिक्त देशी कोंबड्या ह्या स्थानिक बाजारात सुद्धा विकल्या. जवळपास ४५ काळी पिल्ले व ११ कोंबड्या विकल्या. ज्यामुळे ११६५० रुपयांचे उत्पन्न मिळाले. अंडी मात्र काहीच निवडक ग्राहकांना विकली. कारण कोडा ह्यांनी अंड्यांपेक्षा पिल्ले विकण्याला प्राधान्य दिले. २०१७ मध्ये कोडा ह्यांचे कुटुंबाचे ६५% उत्पन्न हे प्रजनन केंद्राद्वारे मिळाले.

आरोग्य सेवा व इतर सेवांची उपलब्धता

जवळचे शासकीय पशू चिकित्सालय हे पडेरू इथे होते जे गावापासून १५ कि.मी. दूर असल्यामुळे स्थानिक लोकांना त्याचा लाभ घेता येत नव्हता. ह्या समस्येवर उपाय म्हणून त्यांनी स्थानिक पशू चिकित्सा सेवक प्रशिक्षित करण्याचे ठरविले. निवडक सदस्यांना प्रामुख्याने महिलांना २-३ दिवसीय कोंबड्या व इतर पशूंच्या आरोग्यसेवांचे प्रशिक्षण देण्यात आले. स्थानिक पशू चिकित्सालयाचे पशू चिकित्सक, सहाय्यकारी संस्था व ह्यांनी प्रशिक्षकांची भूमिका निभावली.

प्रशिक्षित पशू चिकित्सा सेवकांनी समुदायाला पशू आरोग्य सेवा देण्यास सुरू केलेल्या दोन पशू चिकित्सा सेवक हे प्रत्येकी १०० कुटुंबाला



प्रकल्प टीम कडून कोंबड्यांची पिले घेताना महिला

आपल्या सेवा देतात. त्यांना त्यांच्या सेवेचे प्रत्येकी २ रुपये मिळतात. याद्वारे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. पक्षांना रोग किंवा लागण झाल्यास त्यांच्या उपचारांसाठी प्रत्येकी २ रुपये हे सदस्यांच्या आगाऊ जमा केलेल्या (२०० रुपये नोंदणीच्या वेळेस दिलेले) रकमेतून वजा केले जातात. सदस्यांना जमा रक्कम संपल्यास त्यामध्ये पुन्हा रक्कम जमा करावी लागते. पशू चिकित्सकांची उपलब्धता व निर्देशित आरोग्य सेवा पद्धती अवलंबिल्यामुळे कोंबड्यांच्या मरतुकीमध्ये फार मोठ्या प्रमाणात घट झाली.

आरोग्यविषयक व चांगल्या प्रबंधनाच्या पद्धतीची माहिती व ज्ञान या संस्थाद्वारे उपलब्ध झाले. यासोबतच समविचारी व्यक्ती, मित्र ह्यांचेमार्फत देखील सदस्यांना माहिती मिळत गेली.

परिणाम

घरगुती कोंबडी पालन करणाऱ्या पेडाकोडापल्ली गावातील सर्व कुटुंबात पारंपारिक स्थानिक कोंबड्यांच्या पालनाची प्रथा पुर्नप्रस्थापित झाली. स्थानिक समुदाय आता त्यांच्या परसात उत्पादित झालेली अंडी व कोंबड्यांचे मांस नियमित सेवन करीत आहेत. तसेच घरगुती कोंबडी पालनाद्वारे उत्पादित अंडी व कोंबड्या ह्या व्यावसायिकरित्या उत्पादित केलेल्या चिकनपेक्षा निरोगी व सुदृढ असल्यामुळे त्यांच्या कुटुंबांना चांगल्या आरोग्याची शाश्वती मिळाली.

प्रजनन केंद्राच्या स्थापनेमुळे इतर कुटुंबांना स्थानिक पातळीवर पिके उपलब्ध होऊ लागलीच पण त्याशिवाय त्यांच्या विक्रीमुळे अनेकांना चांगले जीवन जगता येऊ लागले. कोंबड्यांची विष्ठा कुजवून पिकांसाठी चांगले खत उपलब्ध झाले. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढली.

देशी कोंबड्यांचे पेडाकोडापल्ली गावात आत पुनरागमन झाले आहे.

References:

CSE, FST Report: Antibiotic Resistance in Poultry Environment. *2018, Center for Science and Environment, New Delhi.*

GOI, 19thLivestock Census, 2012 – All India Report, *2012, Ministry of Agriculture Department of Animal Husbandry, Dairying and Fisheries, Krishi Bhawan, New Delhi.*

WASSAN, Desi Poultry – Project Brief, *2017, WASSAN.* Accessed online: http://www.wassan.org/desipoultry/page_1.htm

Acknowledgements

The authors would like to acknowledge the efforts of the Department of Animal Husbandry (DoAH), Integrated Tribal Development Agency (ITDA), and all the facilitating agencies associated with BYP in Andhra Pradesh for their constant support.

Aneetha Kanukolanu
WASSAN,
#12-13-452,Street No 1,Tarnaka,
Secunderabad - 500017
E-mail: aneethak@wassan.org

मराठी अनुवाद - श्री. लक्ष्मीकांत पडोळे

Source : Backyard Poultry- A success story of a tribal start-up – LEISA India, September, 2018.

LEISA INDIA Language Editions



Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi